30 AUG 2022 लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाला सुवर्णमहोत्सवी निधी मिळावा

## प्रलंबित प्रश्न सुटावेत : उच्च शिक्षणाशी संबंधित कोल्हापुरातील घटकांची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे विविध प्रश्न प्रलंबित आहेत. हीरकमहोत्सवी वर्ष संपत आले तरी शिवाजी विद्यापीठाला अद्याप सुवर्णमहोत्सवी वर्षातील संपूर्ण निधी मिळालेला नाही. विद्यापीठ आणि संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची रिक्त पदांची भरती रखडली आहे. मंत्रालय, शिक्षण संचालक, सहसंचालक पातळीवरील प्रश्न अद्याप कायम आहेत. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील हे कोल्हापूरचे आहेत. त्यांच्याकडून तरी हे प्रलंबित प्रश्न आता सुटावेत, अशी मागणी व्यक्त होत आहे. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री पाटील आज, मंगळवारी कोल्हापुरात त्यांच्याकडे असणाऱ्या विभागांचे प्रश्न, समस्या जाणून घेणार आहेत. त्यापार्श्वभूमीवर उच्च शिक्षण क्षेत्रातील विविध घटकांनी अपेक्षा व्यक्त केल्या. राज्य शासनाकडून सुवर्णमहोत्सवी वर्षातील उर्वरित ३५ कोटी ५८ लाखांचा निधी मिळत नसल्याने नियोजित उपक्रमांची गती मंदावली आहे. तंत्रज्ञान विभागाला शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय म्हणून मान्यतेची प्रतीक्षा अद्याप कायम आहे. रस्ता रुंदीकरणामुळे विभागलेला विद्यापीठाचा कॅम्पस जोडणे हे प्रश्न प्रलंबित आहेत.

### असे आहेत विविध घटकांचे प्रश्न

**प्राचार्यांना प्रोफेसरचा ग्रेड मिळावा**

प्राचार्यांना नियुक्तीवेळी मूळ वेतन ४३,००० मिळावे. प्रोफेसरचा ग्रेड मिळावा. विनाअनुदानित महाविद्यालयांचा संलग्नीकरण कालावधी तीन वर्षांपर्यंत वाढवा, अशी मागणी डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केली.

**सीएचबी हद्दपार करा**

शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यात याव्यात. शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करावा. नेट-सेटग्रस्त प्राध्यापकांना न्याय द्यावा. तासिका तत्त्व हद्दपार करुन समान काम समान वेतन लागू करावे. अशी मागणी डॉ. डी. एन. पाटील यांनी केली.

**वेतन आयोगातील जाचक अटी दूर करा**

सातव्या वेतन आयोगातील जाचक अटी दूर कराव्यात. सुधारित आश्वासित प्रगती योजना पुनर्जीवित करावी. प्रलंबित प्रश्न मार्गी लागावेत, अशी मागणी शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी केली.



### काहीसा दिलासा

गेल्या दोन वर्षांपूर्वी विद्यापीठात तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी 'मंत्रालय @ कोल्हापूर' उपक्रम राबविला. त्यात शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी यांच्याशी संबंधित ३०३४ प्रकरणांची निर्गत करण्यात आली.

लोकमत

# विधि अभ्यासक्रम पेपरप्रकरणी चौकशी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विधि अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षातील बौद्धिकसंपदा कायदा (Intellectual property law) या विषयाच्या पेपरप्रकरणी शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीकडून सोमवारी चौकशी सुरू झाली. या पेपरवेळी सांगली जिल्ह्यातील एका महाविद्यालयात गैरप्रकार घडल्याची तक्रार विद्यापीठाकडे गेल्या आठवड्यात झाली होती.

या तक्रारीची विद्यापीठाने दखल घेऊन परीक्षा प्रमाद समितीच्या माध्यमातून चौकशीची प्रक्रिया सुरू केली. याअंतर्गत सोमवारी सांगलीतील संबंधित महाविद्यालयातील प्राचार्य, एसआरपीडी समन्वयक, संशयित विद्यार्थ्यांची चौकशी करण्यात आली. आठ दिवसांनी पुन्हा सुनावणी होणार आहे. त्यानंतर समितीकडून या प्रकरणाचा अहवाल विद्यापीठाला सादर होईल. या अहवालानुसार दोषींवर पुढील कारवाई होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले. दरम्यान, बौद्धिकसंपदा कायदा या विषयाचा पेपर दि. २६ जुलै रोजी घेतला होता. तांत्रिक कारणामुळे हा पेपर रद्द करून त्याची पुनर्परीक्षा घेण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार या विषयाची पुनर्परीक्षा सोमवारी घेण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
30 AUG 2022 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पदवी प्रथम वर्षापासून अंमलबजावणी

## विद्या परिषद बैठकीत मान्यता; विविध विषयांवर चर्चा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पदवी प्रथम वर्षापासून अंमलबजावणी करणे तसेच संलग्न महाविद्यालयातील नवीन अभ्यासक्रम व तुकड्यांना शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

विद्या परिषदेची बैठक अखेरची बैठक सोमवारी झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यापीठ विद्या परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाल बुधवार (दि. ३१) रोजी संपणार आहे. ऑनलाईन शिक्षण, ऑनलाईन परीक्षा, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी पदवी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमात बदल करून, कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करणे, 'दूरशिक्षण'मधून एमबीए, एमएस्सी गणित विषयाचे शिक्षण देणे, पदवी व पदव्युत्तरचे अनेक नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, आदी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत.

महाविद्यालये व तुकड्यांना विद्यापीठ संलग्नीकरण देण्यात आले. जुन्या शिक्षण कायद्यामध्ये कोणतीही पदवी पाच वर्षांत पूर्ण करावी, असा नियम होता. यात बदल करून नवीन शिक्षण कायदा पदवी प्रथम वर्षापासून लागू करण्याचा झाला. नवीन कायद्यानुसार किती वर्षात पदवी पूर्ण करावी, तो कालावधी जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली. गुण वाढवून घेतलेल्या संबंधित काही विद्यार्थ्यांची पदवी रद्द करण्याचा निर्णय या बैठकीत झाल्याचे समजते.

पुढारी

# आजअखेर २११ उन्हाळी सत्र परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर २११ परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षांना १९ जूनपासून सुरुवात झाली आहे. बी.कॉम., बी.व्होक., एमपीए (व्होकल म्युझिक), एम.एस्सी. (प्राणीशास्त्र), एम.एस्सी. (एजीपीएम), बी.फार्मसी विषयांचे निकाल जाहीर झाले आहेत. दरम्यान, सोमवारी बी.ए. एम.ए., एम.बी.ए.या विषयाच्या परीक्षा झाल्या. ११९६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

पुढारी

# नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी

## प्रा. प्रकाश कुंभार यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना पदवीबरोबरच संशोधांनाच्या संधी, व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संधी, विविध कौशल्य प्राप्त करण्याच्या संधी आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. पदवी स्तरावर प्रवेश घेतलेल्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी हे धोरण लागू झाले आहे. विद्यार्थ्यांनी ते समजून घ्यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. डॉ. प्रकाश कुंभार यांनी केले.

शहाजी छत्रपती महाविद्यालयात आयोजित 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि विद्यार्थी' या विषयावरती ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण अध्यक्षस्थानी होते. डॉ. कुंभार म्हणाले, प्रवाह व काळाबरोबर चालायची गरज आहे. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरण देशात लागू झाले आहे. धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली असून यातील काही धोके येणाऱ्या काळात जाणवतील. प्रास्ताविक आय. क्यू. एस.सी. समन्वयक प्रा. डॉ. एन. एस. जाधव यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. एस. एस. राठोड यांनी करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. जे. बिरजे यांनी केले. प्रा. डॉ. आर. डी. मांडणीकर यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# दोषींवर आठ दिवसांत कारवाई

## 'आयपीआर'बाबत परीक्षा प्रमाद समितीसमोर पहिली सुनावणी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाच्या 'इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राइटस् लॉ' (आयपीआर) या विषयाच्या पेपरबाबत सांगलीतील कॉलेजमध्ये गैरप्रकार झाल्याचा संशय होता. सोमवारी परीक्षा प्रमाद समितीसमोर सुनावणी झाली. येत्या आठ दिवसांत पुन्हा एकदा सुनावणी घेऊन कोणी दोषी आढळल्यास विद्यापीठ नियमानुसार कारवाई केली जाईल, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली. संशयास्पद बाबींमुळे आयपीआर पेपर रद्द करण्यात आला होता. सोमवारी सांगलीतील त्या महाविद्यालयातील संशयित विद्यार्थी, प्राचार्य, समन्वयक यांची रात्री उशिरापर्यंत परीक्षा प्रमाद समितीसमोर चौकशी सुरू होती. पहिल्या सुनावणीत संपूर्ण चौकशी करता न आल्याने पुन्हा एकदा सुनावणी घेण्याचा निर्णय परीक्षा प्रमाद समितीने घेतला आहे. येत्या आठ दिवसांत याबाबत पुन्हा सुनावणी घेण्यात येणार आहे.

तरूण भारत

# नवीन शैक्षणिक धोरणासह अभ्यासक्रमांना मान्यता



- शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय
- विद्या परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाल बुधवारी संपणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत संलग्नित महाविद्यालयातील नवीन अभ्यासक्रम, तुकड्यांना मान्यता देण्यात आली. तसेच नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी पदवी प्रथम वर्षापासून करण्याचा महत्वाचा निर्णय या विद्या परिषद सदस्यांच्या कालावधीत झाला. विद्या परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाल बुधवार ३१ ऑगस्ट रोजी संपणार आहे. त्यामुळे सोमवारी झालेली विद्या परिषदेची बैठक अखेरची होती. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सचिवपदी प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती होती.

शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाल बुधवार ३१ ऑगस्ट रोजी संपणार आहे. या सदस्यांच्या कालावधीत विद्यार्थी हिताचे अनेक निर्णय घेण्यात आले. तसेच सोमवारी झालेल्या बैठकीत शासनाने मान्यता दिलेल्या सर्व विषय, तुकड्या व महाविद्यालयांना मान्यता दिली. तर महाविद्यालये व तुकड्यांना विद्यापीठ संलग्नीकरण देण्यात आले. जुन्या शिक्षण कायद्यामध्ये कोणतीही डीग्री पाच वर्षात पूर्ण करावी, असा नियम होता. या कायद्यात बदल करून नवीन शिक्षण कायदा पदवी प्रथम वर्षापासून लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नवीन कायद्यानुसार किती वर्षात डीग्री पूर्ण करावी, तो कालावधी जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.

### परस्पर गुण वाढवू घेणाऱ्यांची डीग्री रद्द

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऐका विषयाच्या झालेल्या परीक्षेत काही वर्षापूर्वी विद्यार्थ्यांनी परस्पर गुण वाढवून घेतले होते. या प्रकरणाच्या चौकशी अंती संबंधित विद्यार्थ्यांची डीग्री रद्द करून दिलेली परीक्षाही रद्द करण्यास विद्या परिषदेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली, अशी माहिती अधिकृत सूत्रांनी दिली.